Impact Factor : 1.9152 (UIF)
Volume - 3 | Issue - 11 | July – 2017

कोयना अभयारण्य

प्रा.डॉ. विश्वनाथ पवार
छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा.

प्रस्तावना :

कोयना परिसरातील संपन्न जैवविविधतेच्या संरक्षणासाठी कोयना अभयारण्याची निर्मिती करण्यात आली. कोयना अभयारण्याची व्याप्ती ४२३.५५ चौ.कि.मी. आहे. कोयना अभयारण्यात पाटण व जावळी तालुक्यातील ५० गावी येतात. कोयना अभयारण्यातील वृक्षसंपदा, पक्षी व प्राणी जीवन संपन्न आहे. येथे अंजनी ही सदाहरित वनस्पती आढळते. महाराष्ट्राचा राज्यप्राणी शेकरू हा येथील जंगलात आढळतो. अभयारण्यातील मालदिव, पाली,जुंगटी, करंजवडे ही ठिकाणे पट्टेरी वाघांसाठी आदर्शवत आहेत. कोयनानगर, हुंबरळी, नेहरू उद्यान, नवजा,वझर्डे धबधबा ही निसर्ग पर्यटन स्थळे तर जंगली जयगड, वासोटा, चकदेव पर्वत ही ऐतिहासिक पर्यटन स्थळे पर्यटकांचे आकर्षण ठरली आहेत.

कोयना प्रकल्प:

महाराष्ट्र प्रकाशमान व्हावा, महाराष्ट्राची भूमी सुजलाम सुफलाम व्हावी यासाठी कोयना जलविद्युत प्रकल्पाची निर्मिती झाली. १७ जून १९६१ पासून कोयना धरणाच्या शिवाजीसागर जलाशयात पाणी साठवण्यास सुरुवात झाली. कोयना प्रकल्प टप्पा १ व २ मुळे ९८ गावे बुडीत झाली. एकूण ९१७१ खातेदार बाधित झाले. त्यांचे २५,५९९ हेक्टर क्षेत्र कोयना प्रकल्पासाठी संपादित करण्यात आले.[१] कोयना विस्थापितांचे सातारा, सोलापूर, रायगड, ठाणे व सांगली जिल्ह्यात पुनर्वसन करण्यात आले. शासनाने पाठबंधारे व महसूल खात्यास अतिरिक्त ठरणारी संपादित जमीन धरणाच्या पाणलोट क्षेत्रात जमिनीची धूप होऊ नये, धरणात गाळ साठू नये, धरणात जास्तीत जास्त पाणीसाठा होऊन विद्युत निर्मितीसाठी धरणाचे आयुष्य वाढावे म्हणून ती वृक्षाच्छादित करण्यासाठी वनविभागाकडे हस्तांतरित करण्यात आली.

अभयारण्य निर्मितीचा उद्देश:

पूर्वी जंगलाचे स्वरूप आदियुगीन व दुर्गम असल्यामुळे जंगलात राहणाऱ्या प्राण्यांना निसर्गदत्त संरक्षण मिळत होते. विसाव्या शतकाच्या सुरुवातीपासून संपन्न वन्यजीव संपदेवर आक्रमण होऊ लागले. वाढती लोकसंख्या, वाढती पाळीव जनावरांची संख्या, बेसुमार वृक्षतोड, वन्य प्राण्यांची शिकार इत्यादीमुळे काही वनस्पती व वन्य प्राणी नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत. यांचा पृथ्वीतलावरून पूर्ण विनाश झाला तर पुढील पिढीला केवळ त्यांची चित्रे पाहून त्यावर समाधान मानावे लागेल. जीवन साखळीत बिघाड निर्माण होईल. म्हणून अभयारण्यांची आवश्यकता वाटू लागली. मानवी हक्काचे जतन व्हावे, वन्य जीवांना संरक्षण मिळावे, व्यावहारिक फायद्यासाठी निसर्गाशी खेळ खेळणाऱ्यांवर वचक बसावा यासाठी भारत सरकारने वन्यजीव संरक्षण नियम, १९७२ हा कायदा दि. ९/९/१९७२ रोजी अंमलात आणला.[२]

महाराष्ट्र शासनानेही याबाबत प्रयत्न सुरू केले. अस्तित्व धोक्यात असणारे वन्य जीव वाचविणे, त्यांची संख्या वाढविणे, त्यांचे आश्रयस्थान सुरक्षित राखणे, राज्याच्या एकूण भौगोलिक क्षेत्राच्या ४ टक्के क्षेत्र सुरक्षित क्षेत्र असावे असे धोरण ठरविले. यानुसार महाराष्ट्रात ५ राष्ट्रीय उद्याने व ३५ अभयारण्यांची निर्मिती झाली.[३]

कोयना अभयारण्याची घोषणा:

कोयना प्रकल्पास अतिरिक्त ठरणाऱ्या जमिनीवर वनविभागामार्फत १९६२ पासून संपादित १५७१ हेक्टर क्षेत्रावर जलद गतीने वाढणाऱ्या निलगिरी, सुरू, ऑस्ट्रेलियन बाभूळ, सिल्वर ओक, बांबू इत्यादी वृक्षांची लागवड करून वनविभागाने मानवनिर्मित वन तयार केले. कृत्रिम लागवडीमुळे व चांगल्या संरक्षणामुळे चांगले वृक्षाच्छादन निर्माण झाले. मूळच्या राखीव वनात घनदाट वृक्षराई असून तेथे विविध प्रकारचे वन्यजीव आश्रयास आहेत. कोयना परिसरातील संपन्न जैवविविधतेचे महत्त्व लक्षात घेऊन त्यांचे संरक्षण, वाढ व विकास करण्यासाठी महाराष्ट्र शासन महसूल व वनविभाग नोटिफिकेशन क्रमांक डब्ल्यू. एल.पी १०८५/सी.आर. ५८८/ १/५/एफ—५दि.१६ सप्टेंबर १९८५ अन्वये हे क्षेत्र अभयारण्य म्हणून घोषित करण्यात आले.[४]

क्षेत्राची व्याप्ती—

कोयना अभयारण्य १७°२३ ते १७°४४ उत्तर अक्षांशावर तर ७३° ३४ ते ७३° ५१ पूर्व रेखांशावर आहे. कोयना अभयारण्यात पाटण व जावळी तालुक्यातील प्रत्येकी २५ गावे समाविष्ट असून अभयारण्याचे एकूण क्षेत्र ४२३.५५ चौ.कि.मी. आहे. अभयारण्य क्षेत्राची स्थिती खालील प्रमाणे—

राखीव वनक्षेत्र	१६,५७७ हेक्टर
संपादित वनक्षेत्र	६,३६८ हेक्टर
इतर खात्याच्या ताब्यातील क्षेत्र	८,३३२ हेक्टर
खाजगी मालकीचे क्षेत्र	११०७८ हेक्टर
कोयना अभयारण्याचे एकूण क्षेत्र	४२,३५५ हेक्टर[५]

कोयना अभयारण्यात येणारी गावे—

पाटण तालुका:घाटमाथा, तोरणे, गोकुळ, हुंबरळी, कामरगाव, मिरगाव, नवजा, किसरुळे, पुनवली,झाडोली, शिरशिंगे, डिचोली,ढोकावळे, तळोशी, रोहिणे, करंजवडे, वाजेगाव, दास्तान,चिरंबे, आंबेघर, नाहींबे, गोजेगाव, आरल, कुसवडे, देवघर तर्फ हेळवाक.

जावली तालुका:पर्वत, वळवण, चकदेव,शिंदी, मेटशिंदी, आरव,म्हाळुंगे, रवंदी, आडोशी, मोडोशी, कुसापूर,खिरखिंडी, वासोटा, मेट इंदवली, कुसवडे,ताकवली, पाली,जुंगटी, जांबरुख, देऊर, मालदेव, वेळे, सावरट, तांबी, मोरणी, अशी पाटण व जावळी तालुका मिळून ५० गावे होत.[६]

कोयना अभयारण्य चतु:सिमा :

उत्तर : कांदाटी नदी

पूर्व : कोयना नदी शेंबडी, वाघळी, मुनावळे, कारगाव, निवकणे, घाणबी, वाटोळे, कारवट या गावांच्या हद्दी.

दक्षिण : कराड—चिपळूण रस्त्यात असणाऱ्या रासाटी,हेळवाक, शिवंदेश्वर, बोपोली या गावांच्या हद्दी

पश्चिम : रत्नागिरी जिल्ह्याची हद्द.[७]

कोयना अभयारण्य क्षेत्रातील वनांचा प्रकार व वनस्पती:

१. प्रकार ८ :ए/सी— २ वेस्टर्न मौन्टेन सब ट्रॉपिकल फॉरेस्ट.

२. प्रकार २:ए/सी— २ वेस्ट कोस्ट सेमी एव्हरग्रीन फॉरेस्ट.

३. प्रकार ३ :वी/सी—२ सदर्न मिक्सड्डेसिडयुअस फॉरेस्ट.

या वनांमधील झाडांचा विस्तार साधारणपणे १२ ते २० मीटर उंचीपर्यंत असतो. येथे जुन्या, मध्यम नवीन वृक्षवेली आढळतात.

येथे वार्षिक सरासरी पर्जन्यमान ५००० मिलिमीटर एवढे आहे.

कोयना अभयारण्यातील वनस्पती—

अंजनी ही सदाहरित वनस्पती येथे आढळते. त्याच प्रमाणे आंबा, जांभूळ, पिसा, हिरडा, आवळा,ऐन, किंजळ, असाना,फणस, उंबर, करंज, कुंभा, सातवीन, कोशिंब,भोमा, आपटा,चांदाडा, बहावा, बिबी, बोंडारा, गेळा,धूप, आळू, नाना, सावर, निलगिरी, सुरू इत्यादी जातीचे वृक्ष येथे विपुल प्रमाणात आहेत. कोयना अभयारण्यात करवंद,कारवी, निरगुडी, वाघाटी, तमालपत्र, तोरण, धायटी, कडीपत्ता, बुरांबी, नरक्या, मुरुडशेंग, गारंबी, दौना, चिमट, शिकेकाई इत्यादी झुडपे व वेली आढळतात. काही प्रमाणात बांबू व वेत आढळतो. तसेच कोळंब, डोंगरी व कुसळ या प्रकारचे गवत आढळते.[८]

कोयना अभयारण्यातील पक्षी व वन्य प्राणी:

पक्षी —

कोयना अभयारण्यातील दाट वृक्षराजीमुळे येथे रानकोंबडी, धनेश, बहिरी ससाणा, मोर, घार, गिधाड, तितर, बटेरलावा, भारद्वाज, कबूतर, कोकीळ,पोपट, बारबेट, बुलबुल, चंडोल, कोतवाल,पिलक मैना, भोरड्या,पाणलावा, पाकोळया, मिनिवेट, फ्लायकॅचर, रॉबिन,शैलकस्तुर, धोबी, मछलीमार, सूर्यपक्षी, खंड्या इत्यादी पक्षी मोठ्या प्रमाणात आढळतात.

वन्यप्राणी—

कोयना अभयारण्यात वाघ, बिबट्या, अस्वल, रानकुत्रा, शेकरू, सांबर, भेकर, चौशिंगा, रानडुक्कर, खवले मांजर, साळींदर, कोल्हा, वानर, ससा, मुंगूस इत्यादी प्राणी आढळतात.

तालिका — कोयना अभयारण्य — मागील काही वर्षातील प्राणी गणनेनुसार आकडेवारी

वन्यप्राण्याचे नाव	१९९७	२००१	२००२	२००३
पट्टेरी वाघ	२	३	५	६
बिबटे	११	१७	१४	२१
गवे	२२० ते २५०	२२० ते २५०	३१५	४९४ ते ९९६
अस्वल	७० ते ८०	७३ ते ८३	९५	४७ ते १५२
सांबर	१६० ते १७५	१७० ते १८०	२०५	८८ ते २८८
भेकर	१८० ते २००	१९० त २००	१६५	१३१ ते २९२
शेकरु	—	—	—	४० ते १४९
रानकुत्रे	—	—	—	३५ ते ५०

संदर्भ माहिती पुस्तिका, कोयना अभयारण्य, कोल्हापूर वन्यवीज विभाग, महाराष्ट्र शासन.[९]

कोयना अभयारण्यातील महत्वपूर्ण पर्यटन स्थळे:

कोयना परिसरात संपन्न निसर्गाचे दर्शन होते. येथे अनेक ठिकाणी विस्तीर्ण प्रदेशात घनदाट जंगल आहे. ज्याठिकाणी विरळ जंगल होते तेथे वनविभागाने जलद वाढणाऱ्या वृक्षांची लागवड करून मानवनिर्मित वन तयार केले. कोयना धरणाच्या जलाशयामुळे येथील वनसंपदेला नैसर्गिक संरक्षण प्राप्त झाले. दि. १६ सप्टेंबर १९८५ रोजी महाराष्ट्र सरकारने कोयना अभयारण्याची घोषणा केली.

कोयना अभयारण्यात संपन्न जैवविविधता आहे. अनेक विविध प्रकारचे वृक्ष, वेली,झुडपे, प्राणी, पक्षी, फुलपाखरे, जलचर येथे पहावयास मिळतात. कोयना अभयारण्यात गवा, सांबर, भेकर, शेकरू, अस्वल, रानकुत्री यांची संख्या मोठी आहे. उन्हाळयात पाण्यावर आलेल्या गव्यांचा कळप जलाशयाकाठी अनेक ठिकाणी हमखास दृष्टीस पडतो. येथील उंच वृक्षराजीत महाराष्ट्राचा राज्य प्राणी शेकरू पहावयास मिळतो. अभयारण्याच्या कोकण कडयांकडील बाजूस नामशेष होण्याच्या मार्गावर असणाऱ्या गिधाडांचे अस्तित्व दिसून येते. अभयारण्यातील मालदिव, पाली,जुंगटी, करंजवडे ही ठिकाणे पट्टेरी वाघांसाठी आदर्शवत ठिकाणे होत. वन्यप्राणी गणनेवेळी या ठिकाणी वाघाच्या पावलांचे ठसे व त्यांची विष्ठा आढळून आली आहे.[१०]

कोयनानगर, हुंबरळी, नेहरू उद्यान, नवजा, ओझर्डे धबधबा या ठिकाणांना पर्यटक भेटी देतात. जंगली जयगड, वासोटा उर्फ व्याघ्रगड, नागेश्वर गुहा, रौद्रभीषण बाबुकडा, चकदेव पर्वत यामुळे कोयना अभयारण्याला ऐतिहासिक महत्त्व प्राप्त झाले आहे. छ. शिवाजी महाराजांनी सन १६५६ मध्ये मोऱ्यांच्या ताब्यातील जावळी प्रांत जिंकला. यावेळीच वासोटा किल्ला त्यांच्या ताब्यात आला.मोऱ्यांची जावळी म्हणजे वाघाची जाळी समजली जायची. कोयनेच्या घनदाट अरण्यात आज व्याघ्र प्रकल्प साकारलाय. तिथे साडेतीनशे वर्षापूर्वी निबीड अरण्य होते. वाघांचा आढळ असणाऱ्या निबीड अरण्यातील वासोटा या वनदुर्गाला छ. शिवाजी महाराजांनी अत्यंत विचारपूर्वक व्याघ्रगड असे नाव दिल्याचे दिसते. आज व्याघ्र प्रकल्पाचा हा टुरिझम झोन आहे. शिवाजीसागरामुळे बामणोली व तापोळा ही जलपर्यटन केंद्र म्हणून प्रसिद्धीस आली आहेत.

कोयना अभयारण्यात पर्यटकांना निसर्ग पाऊल वाटांनी भ्रमंती करावी लागते. कारण येथे भ्रमंतीसाठी रस्ते नाहीत. अभयारण्यातील भ्रमंतीसाठी असणारे मार्ग याप्रमाणे – १) बामनोली ते मेट इंदवली लॉंच मार्ग, मेट इंदवली ते वासोटा–२ किलोमीटर २) वासोटा ते माडोशी–५ कि.मी. ३) शिंदी ते चकदेव–५ कि.मी.४) शिंदी ते पर्वत–५ कि.मी. ५) नवजा ते रामबाण–५ कि. मी. ६) नवजा ते जंगली जयगड–४कि.मी. या पाऊलवाटा होत.

अभयारण्य भेटीस उपयुक्त काळ–

दर वर्षी १६ ऑक्टोबर ते १५ जून हा होय. त्यात नोव्हेंबर ते मार्च हा काळ पर्यटनास अधिक लाभदायी होय. दरवर्षी १६ जून ते १५ ऑक्टोबर हा पावसाळयाचा काळ पर्यटनास बंदी असणारा काळ होय. त्याचबरोबर वन्यप्राणी गणना काळ तसेच ३१ डिसेंबर सूर्यास्त ते २ जानेवारी सूर्योदय हा प्रवेश सर्वकाळ बंद असतो. पर्यटनासाठी कोयनानगर किंवा बामणोली येथून पूर्व परवानगी घेणे आवश्यक असते. [११]

सारांशः

कोयना अभयारण्य जलाशयामुळे दुर्गम बनले आहे. यामुळे येथील वन्यप्राण्यांना चांगले संरक्षण प्राप्त झाले आहे. येथील पक्षी, प्राणी व इतर जैवविविधता अत्यंत संपन्न आहे. वन्यजीव संरक्षण कायद्यामुळे चोरट्या शिकारीला आळा बसतो आहे. कोयना अभयारण्याला वासोटा, जंगली जयगड, भैरवगड इत्यादी किल्ल्यांमुळे ऐतिहासिक महत्त्व प्राप्त झाले आहे.

संदर्भ सूची–

१. रेकॉर्ड कोयना धरण पुनर्वसन उपविभाग क्र. २ सातारा.
२. शेलकर अभया, वन्यजीव संरक्षण, नाशिक लॉ हाऊस, पृष्ठ १९
३. पवार –खैरनार, महाराष्ट्रातील वन्यजीव संपदा, युनिटी प्रकाशन, पुणे, पृ.१७
४. मोटे आर.ए., सहाय्यक वनसंरक्षक वन्यजीव, माहिती पुस्तिका कोयना अभयारण्य, शासकीय फोटो झिंको मुद्रणालय, पुणे, प.१
५. कित्ता, पृ.२
६. कित्ता, पृ.३ व ४
७. कित्ता, पृ.३
८. कित्ता, पृ.४
९. वन्यजीव विभाग कोल्हापूर – केंद्र पुरस्कृत योजनेअंतर्गत २००३ – ०४ माहिती पुस्तिका,'कोयना अभयारण्य' व मोटे आर.ए. उपरोक्त, पृ.५
१०. कुलकर्णी रमण (संकलक) सहयाद्री व्याघ्र प्रकल्पतील जैवविविधता भाग१, वन्यजीव विभाग, कोल्हापूर, पृ.१३
११. टिपण्णी, कोयना अभयारण्य, वन्यजीव विभाग, कोल्हापूर,महाराष्ट्र शासन.